यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_prtmdc@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (0253) 2230191

प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र / Prof. Ram Takwale Research & Development Centre

# कार्यशाळेचा अहवाल

**विषय : AI for Academic & Administrative Excellence**
**ठिकाण : Auditorium Hall**
**तारीख : दि. २२ मे २०२५** **वेळ : सकाळी ११:०० ते सायंकाळी ०५:००**

---

दि. २२ मे २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात 'कृत्रिम बुद्धिमत्तेचा उत्कृष्ट शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजासाठी उपयोग' (AI for Academic & Administrative Excellence) याविषयी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे सर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्राच्या संचालक, इमरटस प्रो. कविता साळुंके, व्यवस्थापन मंडळ सदस्या प्रा. संजीवनी महाले, तसेच महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एमकेसीएल) च्या श्रीमती रेवती नामजोशी, श्री. सौम्य रंजन पानी, श्री. अविनाश देशमुख, श्री. मोहसीन शेख, अनुपम क्षीरसागर, सर्व विद्याशाखा, केंद्र व विभागांचे संचालक, प्राध्यापक, शैक्षणिक संयोजक, प्रशासकीय संयोजक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सर्व विभागीय केंद्रांतील कर्मचारी online ZOOM Meeting द्वारे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक इमरटस प्रो. कविता साळुंके यांनी केले. यावेळी त्यांनी दैनंदिन कामात AI चा वापर केल्याने काय बदल होऊ शकतो आणि आपले काम अधिक वेगाने कसे होऊ शकते, यातून कार्यशाळा आयोजनाचा हेतू उपस्थितांसमोर मांडला.

कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित यापुढील शिक्षण हे अधिक संवादी व अनुभवावर आधारित असणार आहे. त्यात हे तंत्रज्ञान विद्यार्थ्यांच्या भावभावना समजू शकले, तर शिक्षणात क्रांती होवू शकते. असे मत महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एमकेसीएल) च्या श्रीमती रेवती नामजोशी यांनी यावेळी बोलताना मांडले.

मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे सर यांनी उद्घाटनपर मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी येणाऱ्या काळात माहिती म्हणजेच विदा (डाटा) ला सोन्यापेक्षा अधिक महत्व येणार आहे. आपल्याकडील माहिती किती समृद्ध आहे, यावर आपल्या कामकाजातील कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) वापर अधिक प्रभावी व उपयुक्त ठरणार आहे. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचे ज्ञान व वापर माहित असणाऱ्या व्यक्तींनाच नोकरीच्या अधिक संधी व प्राधान्य प्राप्त होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता वापराचे जसे फायदे आहेत, तशा त्याच्या काही मर्यादा देखील आहेत. त्या समजून घेतल्या पाहिजेत. एकूणच कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) वापर हा चांगल्या व विधायक कामासाठी व्हावा,ही सर्वांची नैतिक जबाबदारी आहे, असे विचार मांडले.

कार्यशाळेच्या सकाळच्या सत्रात महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एमकेसीएल) चे सौम्य रंजन पानी, श्रीमती रेवती नामजोशी, श्री. मोहसीन शेख यांनी उपस्थित सर्वांना कृत्रिम बुद्धिमत्तेचा उत्कृष्ट शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजासाठी उपयोग करण्यासाठी विविध AI Tools याविषयी मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी

मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VC/1471
दि. 26/5/2025

Scanned with CamScanner

ChatGPT, Gemini, Gamma.ai, Presentation.ai, Napkin.ai आणि Julius.ai या AI Tools चा Letter/e-mail Drafting, Finding applicable laws, Syllabus Drafting, Correlation among documents या वेगेवेगळ्या कामात होणारा वापर आणि उपयोग याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे मार्गदर्शन केले. तसेच या AI Tools चा वापर करताना Prompts कसे लिहावेत आणि योग्य Prompts च्या माध्यमातून अपेक्षित माहिती कशी मिळवावी, याबाबत मार्गदर्शन केले. Prompts देताना Context, Task, Instructions, Clarify, Refinement या पायऱ्यांचा वापर कसा करावा, याची महिती दिली. वरील Tools च्या माध्यमातून content, Images, PPT, Infographics कसे तयार करावेत, याची प्रात्याक्षिके दाखवली.

दुपार सत्रात सर्व सहभागींची प्रत्यक्ष सरावासाठी दोन गटात विभागणी करण्यात आली. सर्व Academic Staff यांना Computer Lab येथे आणि Administrative & Support Staff यांना ज्ञान स्त्रोत केंद्रातील Computer Lab येथे बसविण्यात आले. यावेळी MKCL च्या Expert Team ने दोन्ही ठिकाणी सहभागींना प्रत्यक्ष ChatGPT, Gemini, Gamma.ai, Presentation.ai, Napkin.ai आणि Julius.ai या AI Tools च्या वापराचे Hands on activities द्वारे प्रशिक्षण दिले.

या कार्यशाळेचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र येथील शैक्षणिक संयोजक डॉ. वसुदेव व्ही. राऊत यांनी केले. सदर कार्यशाळा यशस्वितेसाठी प्र. गणेश लोखंडे, श्री. विजय भाकरे, तन्मय बोरसे, ऋतिक पुगे, राधिका शिंदे, वृषाली सोनवणे यांनी परिश्रम घेतेले. या कार्यशाळेमध्ये १७५ सहभागींनी AI वापराचे प्रशिक्षण पूर्ण केले.

**डॉ. वसुदेव व्ही. राऊत**
शैक्षणिक संयोजक,
प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र

मार्फत -

**इमरटस प्रो. कविता साळुंके**
प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र
आणि स्कूल ऑफ डिजिटल एज्युकेशन

सोबत :

१. कार्यक्रमाचे परिपत्रक,
२. कार्यक्रमाचे बॅनर,
३. कार्यक्रमपत्रिका,
४. वर्तमानपत्रातील बातम्या,
५. निवडक फोटो

26/5/2

मा. कुलगुरु

Scanned with CamScanner

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_prtrndc@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (0253) 2230191

प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र / Prof. Ram Takwale Research & Development Centre

PRTRNDC/2025/ 458 Date: 16 / 05 / 2025

# परिपत्रक

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील सर्व शैक्षणिक आणि प्रशासकीय सहकाऱ्यांसाठी दिनांक २२ मे २०२५ रोजी Maharashtra Knowledge Corporation Limited (MKCL) आणि प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने **'AI संदर्भातील एक दिवसीय प्रशिक्षण'** अनिवार्य करण्यात आले आहे. यातून AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) विषयक नव-नवीन तंत्रज्ञान व त्याचा शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रातील उपयोग यासंदर्भातील आपले ज्ञान व कौशल्ये यांचा विकास होण्यास मदत होईल.

**ठिकाण :- ऑडीटोरियम हॉल, शैक्षणिक इमारत, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक.**

**वेळ :- सकाळी १०:०० ते ५:३०**

कृपया सर्व सहकाऱ्यांनी सोबत दिलेल्या link द्वारे आपली नोंदणी करावी.

Google form link - https://forms.gle/P1gGo4ADSuabQEm67

(दिलीप भरड)
कुलसचिव

प्रत:

- मा. कुलगुरू कार्यालय
- मा. प्र. कुलगुरू कार्यालय
- सर्व विद्याशाखा संचालक / विभाग प्रमुख यांना विनंती की सदर परिपत्रक आपल्या अधिनस्थ शैक्षणिक संयोजकांच्या निदर्शनास आणून द्यावे.

Scanned with CamScanner

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_prtrndc@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (0253) 2230191

प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र / Prof. Ram Takwale Research & Development Centre

PRTRNDC/2025/461

Date: 20/05/2025

प्रती,
**सर्व मा. संचालक**
विभागीय केंद्र,
य.च.म. मुक्त विद्यापीठ

नमस्कार,

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये सर्व शैक्षणिक व प्रशासकीय सहकाऱ्यांसाठी **"AI for Academic & Administrative Excellence"** यासंदर्भातील प्रशिक्षण विद्यापीठात दि. २२ मे २०२५ रोजी सकाळी ११ ते ४ या वेळेत आयोजित करण्यात आलेले आहे. विभागीय केंद्रावरील सर्व सहकाऱ्यांना ११ ते १ या दरम्यान ऑनलाईन पद्धतीने वा प्रत्यक्ष या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन २ ते ४ या वेळेत प्रशिक्षणासंदर्भातील काही कृतींचा वैयक्तिकरित्या सराव करता येईल. विभागीय केंद्रावरील सर्व सहकाऱ्यांना याचा लाभ घेता यावा यासाठी आपण सदर पत्र सर्व सहकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे व त्यांना सोबतच्या registration link वर नाव नोंदणी करण्यास सूचित करावे ही विनंती.

Registration Link - https://forms.gle/P1gGo4AD5uebQEmf67

धन्यवाद आपल्या सहकार्याच्या अपेक्षेसह !

**इमरटस प्रोफेसर कविता साळुंके**
संचालक, प्रो. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र

Scanned with CamScanner

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र,

Maharashtra Knowledge Corporation Ltd. (MKCL)

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## कार्यशाळा

**AI for Academic & Administrative Excellence**

(शैक्षणिक व प्रशासकीय उत्कृष्टते साठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग)

दि. २२ मे २०२५

## कार्यक्रम पत्रिका

| | |
|---|---|
| १०:४५ ते ११:०० | चहापान |
| ११:०० ते ११:०२ | उपस्थितांचे स्वागत |
| ११:०२ ते ११:०५ | विद्यापीठ गीत |
| ११:०५ ते ११:१० | प्रास्ताविक<br>इमरटस प्रो. कविता साळुंके, संचालक, स्कूल ऑफ डिजिटल एज्युकेशन |
| ११:१० ते ११:१५ | तज्ञांचे स्वागत व सत्कार |
| ११:१५ ते ११:३० | मा. कुलगुरूंचे मार्गदर्शन |
| ११:३० ते ०१:३० | कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक मार्गदर्शन सत्र (MKCL Team)<br>स्थळ : Auditorium Hall, Academic Building |
| ०१:३० ते ०२:३० | कर्तव्य भोजन |
| ०२:३० ते ०४:३० | कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक Hands on Activities व मार्गदर्शन (MKCL Team)<br>स्थळ :<br>1. Academic Staff - Math's Lab,<br>2. Administrative Staff - Computer Lab & Classroom in Knowledge Resource Centre |
| ०४:३० ते ०४:३५ | चहापान |
| ०४:३५ ते ०४:४५ | शंका समाधान |
| ०४:४५ ते ०५:०० | आभार<br>डॉ. वसुदेव राऊत,<br>प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र |

Scanned with CamScanner


# DESHDOOT *Times*

*....watching north maharashtra*

epaper.deshdoot.com
23 May 2025 - Page 4

YCMOU PRO DETM
P4 230525


## Workshop on AI held at YCMOU



**NASHIK:** A day-long workshop on 'Use of Artificial Intelligence (AI) for Academic-Administrative Excellence' was held at Yashwantrao Chavan Maharashtra Open University (YCMOU). Organized by the university's Prof. Ram Takwale Research and Development Centre, the workshop aimed to equip educators and administrators with practical knowledge of AI tools and their applications in education and governance.

The workshop was inaugurated by Vice Chancellor Prof. Sanjeev Sonawane, in the presence of Pro Vice Chancellor Dr. Jogendrasinh Bisen, Management Council Member Dr. Sanjeevani Mahale, and other officials.

In his inaugural address, Prof. Sonawane emphasized the growing importance of data and digital tools in the modern era. "In the near future, information wealth will surpass even gold and mineral wealth in value," he stated. He added that the effective use of Artificial Intelligence depends on how rich and structured our data is. Those who gain expertise in AI will have a competitive edge in the job market, he noted.He also cautioned that while AI offers great potential, users must be aware of its limitations and ethical boundaries. "It is our collective responsibility to use AI for constructive, meaningful, and ethical purposes," he urged, encouraging participants to become tech-savvy and forward-thinking.

Revati Namjoshi from Maharashtra Knowledge Corporation Limited (MKCL), Pune, highlighted how AI will revolutionize education by making it more interactive and emotion-sensitive. She noted that future learning systems could become adaptive to students' feelings, thereby enhancing engagement and understanding.In technical sessions that followed, MKCL experts Soumyaranjan Pani, Revati Namjoshi, and Mohsin Shaikh conducted hands-on training on various AI tools. They demonstrated how AI can be used to create text documents, design presentations, draft summaries, write letters and emails, and more.

Prof. Kavita Salunke made the introductory speech, while Prof. Vasudev Raut compered the programme and also proposed the vote of thanks.


YCMOU PRO GK MS 230525

# गांवकरी

www.gavakari.net
23 May 2025 - Page 5


## मुक्त विद्यापीठात कार्यशाळा

**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात 'शैक्षणिक प्रशासकीय कार्य उत्कृष्टतेसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (ए. आय.) वापर' विषयी प्रात्यक्षिक कार्यशाळा संपन्न झाली. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठाच्या प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्रातर्फे आयोजित या कार्यशाळा उद्घाटनप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन, व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले, स्कूल ऑफ डिजीटल एज्युकेशनच्या संचालिका एमिरेटस प्रा. कविता साळुंके, व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेचे प्रा, जयदीप निकम, प्रा. गणेश लोखंडे, परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील, रेवती नामजोशी, सौम्यारंजन पानी, अविनाश देशमुख आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

महासागर

YCMOU PRO MSG P2
240525

# मुक्त विद्यापीठात प्रात्याक्षिक कार्यशाळा संपन्न

## शैक्षणिक- प्रशासकीय कार्य उत्कृष्टतेसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर







Scanned with CamScanner





Scanned with CamScanner





Scanned with CamScanner






Scanned with CamScanner